

अभिनेते किरण गायकवाड यांची पवनाथडी जत्रेस भेट

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 25/02/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 52 || RNI - MAHMAR/2021/51259 || metrocity924@gmail.com


# 'एआय' आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व महाराष्ट्र करेल– मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) माध्यमातून राज्य शासनामार्फत प्रशासन व अर्थव्यवस्थेला गती देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य लवकरच भारताच्या एआय आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. हॉटेल ग्रँड हयात येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लीडरशिप समिट कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नॅसकॉमचे श्रीकांत वेलामकन्नी यांनी मुलाखत घेतली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात डिजिटल सेवांचे प्रमाण वाढले असून, बहुतांश शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत. राज्य शासनाने मुंबई विद्यापीठात एआय सेंटरची स्थापना केली आहे. जागतिक आर्थिक मंचासोबत भागीदारीतून इंडस्ट्री सेंटर स्थापन करण्यात आले आहे.फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने १ ट्रिलियन डॉलरपर्यंत अर्थव्यवस्था नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी नीती आयोगाच्या सहकार्याने नवीन आर्थिक रोडमॅप तयार केला जात आहे. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्राला (MMRDA) १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. डेटा सेंटर आणि फिनटेक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर देशातील ६०% डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. नवीन मुंबईत डेटा सेंटर पार्क उभारण्यात येत असून, २०३० पर्यंत राज्यातील ५०% वीजनिर्मिती हरित ऊर्जेवर



आधारित असेल. मुंबई ही भारताची 'फिनटेक राजधानी' असल्याचेही ते यावेळी म्हणाले. नाशिक कुंभमेळा ; अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर नाशिक येथे २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. या ठिकाणी गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा, आणि आभासी अनुभव यासाठी अत्याधुनिक उपाययोजना केल्या जातील. यावेळी त्यांनी उत्तर प्रदेशात महाकुंभमेळा यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे कौतुकही केले. कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढवणार मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'अॅग्री-स्टॅट' उपक्रमाअंतर्गत संपूर्ण शेती प्रक्रियेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. 'ड्रोन शक्ती' कार्यक्रमांतर्गत ड्रोन प्रशिक्षण देऊन कृषी फवारणी खर्च कमी करण्याचा मानस आहे.

# विद्यार्थ्यांच्यासाठी अभ्यासक्रम निश्चित करावे - राज्यपाल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक आकांक्षा पूर्ण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम निश्चित करताना आर्थिक दुर्बल घटकातील पात्र तरुणांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात समाविष्ट करून घ्यावे, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 30 व्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक कोळसकर, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, दापोली येथील बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे, विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, कुलसचिव दिलीप भरड यांच्यासह विविध विद्याशाखांचे प्रमुख उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, जगातील अनेक प्रगत देश कौशल्य असलेल्या मनुष्यबळाचा शोध घेत आहेत. ते त्यांची भाषा जाणणाऱ्या कुशल मनुष्यबळाची मागणी करतात. या पार्श्वभूमीवर जपानी, जर्मन, रशियन, इटालियन, फ्रेंच किंवा अगदी इंग्रजी भाषेतील लघु अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार विद्यापीठाने करावा. देशातील शैक्षणिक प्रणाली लवकरच परीक्षा केंद्रित मॉडेलपासून परिणाम आधारित मॉडेलकडे संक्रमण करणार आहे. हा बदल विद्यार्थ्यांना अधिक रोजगारक्षम बनविण्याबरोबरच त्यांना उद्योजक बनण्यासाठी सक्षम करेल आणि 2047 पर्यंत 'विकसित भारताचे' स्वप्न पूर्ण करण्यास पूरक ठरेल, असा विश्वास राज्यपाल राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

भारतामध्ये 2036 पर्यंत उच्च शिक्षणात 50 टक्के नोंदणी साध्य करण्याचे स्वप्न फक्त मुक्त आणि दूरस्थ शिक्षण क्षमतेचा वापर करूनच साकारता येईल. दुर्गम भागातील आणि शैक्षणिक प्रवाहापासून दूर असणाऱ्या व्यक्तींना यामुळे शिक्षणाची संधी मिळू शकेल.

# महानगरपालिकेतील भिंती सजल्या विद्यार्थ्यांच्या चित्रांनी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत असणाऱ्या जिन्याच्या भिंती विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांनी सजल्या आहेत. महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी या चित्रांची पाहणी करीत विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे व असा अनोखा उपक्रम राबवल्याबद्दल शिक्षण विभागाचे कौतुक केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या सहकार्याने नुकतीच ‘कॅनव्हास ऑफ क्युरिऑसिटी’ हा चित्रकला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात आकांक्षा फौंडेशनच्या पाच शाळांसह महानगरपालिकेच्या ३४ शाळांनी सहभाग घेतला होता. चित्रकला मेळाव्यात २९० विद्यार्थ्यांनी ४० शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध चित्रांचे रेखांटन केले.

विद्यार्थ्यांना चित्र काढण्यासाठी विविध विषय तसेच चित्रकलेचे साहित्य देण्यात आले होते. यामध्ये ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी ‘माझे गाव, माझे विश्व’, ‘विविधतेतील एकता’, ‘परंपरा आणि आधुनिकता’ यांसारख्या विषयांवर कल्पक चित्रे साकारली. यामधील उत्कृष्ट चित्र महानगरपालिकेच्या जिन्यातील भिंतीवर लावण्यात आली आहेत. या चित्राची पाहणी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी करीत विद्यार्थ्यांच्या कलेचे कौतुक केले. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भिंतीवर लावण्यात आलेली विद्यार्थ्यांची चित्र ही विविध सामाजिक संदेश देणारी आहेत. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या चित्रांमध्ये त्यांच्यातील रंगसंगतीचे भान, विषयाचे सादरीकरण करण्याची कला, सर्जनशीलता दिसून येत असून शिक्षण विभागाचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# शहरातील मेट्रो मार्गीका व परिवहन विकासाबाबत माहिती द्या - आ.अमित गोरखे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड शहरातील मेट्रो मार्गीका व परिवहन विकास कसा असेल? याबाबत शहरातील सर्व पक्षीय माजी नगरसेवक व सर्व सामाजिक संस्था प्रमुख व राजकीय पक्षांचे प्रमुख पदाधिकाऱ्यांना बैठक बोलावून माहिती देण्याची मागणी आमदार अमित गोरखे यांनी मेट्रो महाव्यवस्थापक श्रावण हर्डीकर, मनपा आयुक्त शेखर सिंग यांच्याकडे केली आहे.**



ते म्हणाले, पुणे जिल्ह्यासह पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वाढती लोकसंख्या व अतिजलद शहरीकरणामुळे शहराच्या वाहतूक समस्येने गेल्या दोन दशकांत गंभीर रूप धारण केलेअसून पर्याय मार्ग म्हणून मेट्रो अस्तित्वात आली असून पुणे मेट्रो हा नागरी सार्वजनिक जलद परिवहन रेल्वे प्रकल्प महाराष्ट्र राज्यातील पुणे व पिंपरी-चिंचवड या जुळ्या शहरांची वाहतूक समस्या सोडवण्यासाठी राबवण्यात येत असून खऱ्या अर्थाने हा प्रकल्पा अत्यंत कौतुकास्पद आहे.

परंतु, स्थानिक स्वराज्य संस्था हद्दीमध्ये प्रशासक लागू झाल्यापासून माजी नगरसेवक व प्रमुख पदाधिकारी कोणत्याही प्रकारची माहिती दिली जात नसल्याने पिंपरी चिंचवड शहरातील मेट्रो मार्गीका व परिवहन विकास कसा असेल याबाबत शहरातील माजी नगरसेवक ,सामाजिक संस्था प्रतिनिधी व सर्व पक्षीय प्रमुख पदाधिकाऱ्यांना बैठक बोलावून माहिती द्या, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी मेट्रो महाव्यवस्थापक श्रावण हर्डीकर, व मनपा आयुक्त शेखर सिंग यांच्याकडे केली आहे.

# पीसीयू मध्ये क्रीडारंभ महोत्सवाचा समारोप




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे पिंपरी चिंचवड विद्यापीठ साते, वडगाव मावळ येथील प्रांगणात "क्रीडारंभ २०२५" या तीन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सवाचा यशस्वी समारोप करण्यात आला. क्रीडारंभचे उद्घाटन क्रिकेटपटू रोहित मोटवानी याच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी पीसीयूच्या कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, क्रीडा समितीच्या अध्यक्षा डॉ. प्रोतिभा नाथ बॅनर्जी, डॉ. अमित पाटील, डॉ. वी एन पाटील, डॉ. रामदास बिरादार, मकबूल खान, डॉ. अंजू बाला, डॉ. राजकमल उपाध्याय आदींसह विविध विभागाचे प्रमुख, प्राध्यापक व सहभागी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी या सांघिक खेळांबरोबरच कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस या वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आले यामध्ये दीड हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना व संघांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. कौस्तुभ भोसले या विद्यार्थ्याने दिल्ली येथे झालेल्या १९ व्या आशियाई क्रीडा स्पर्धा मध्ये मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल सत्कार करण्यात आला. क्रीडारंभ २०२५ चे आयोजन कुलपती हर्षवर्धन पाटील, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

# प्रतिमा काळे यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व आय.आय.बी.करिअर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरस्कार सोहळा निमित्त प्रतिमा अरुण काळे,सरस्वती माध्यमिक विद्यालय,आकुर्डी,पुणे ३५ यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार,२०२५ ज्येष्ठ साहित्यिक ,८९ वे अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस सर,शिक्षण अधिकारी डॉ.भाऊसाहेब करेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासन अधिकारी श्रीमती संगीता बांगर मॅडम,सहाय्यक आयुक्त माननीय विजयकुमार थोरात सर,प्रसाद गायकवाड सर,नंदकुमार सागर सर,सुबोध गलांडे सर,संभाजी पडवळ सर,हेमंत कुमार अभोणकर सर,बाबाजी शिंदे सर,कृष्णा काळे सर या शुभ प्रसंगी उपस्थित होते.पुरस्कार बाबत प्रतिक्रिया देतांना त्या म्हणाल्या,पुरस्कार म्हणजे कौतुकाची थाप असते,नवीन कार्य करण्याची ऊर्जा असते.सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# पवनाथडी जत्रेला नागरिकांची तुफान गर्दी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पवनाथडी जत्रेच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच रविवारी २३ फेब्रुवारी रोजी नागरिकांची तुफान गर्दी झालेली पाहायला मिळाली. चविष्ट अशा महाराष्ट्रीयन पाककलेच्या समृद्ध भोजनाचा आनंद घेण्यासाठी खव्वयांनी शाकाहारी आणि मांसाहारी खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सच्या बाहेर गर्दी केली होती.

तर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाने संध्याकाळी उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झालेले पाहायला मिळाले.महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्य विकसित व्हावे तसेच महिलांचे सबलीकरण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने २१ ते २४ फेब्रुवारी या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर पवनाथडी जत्रा भरविण्यात आली आहे. या पाच दिवसीय जत्रेच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी जत्रेचा आनंद घेण्यासाठी लोकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महापालिकेच्या वतीने आयोजित पवनाथडी जत्रा लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. याठिकाणची नेत्रदिपक विद्युत रोषणाई, रचनात्मक स्टॉल्सच्या रांगा आणि सेल्फी काढण्यासाठी तयार केलेल्या सेल्फी पॉईंट्सवर लोकांची गर्दी होत आहे. जत्रेमध्ये कॉस्मेटिक्स, बॅग्स, साड्या, भांडी या स्टॉल्सवर महिलांची गर्दी होताना दिसत आहे.



तर लहान मुलांसाठी खेळणी, पुस्तकं, कार्टूनच्या बाहुल्यांची असंख्य स्टॉल्स येथे उपलब्ध आहेत. शिवाय वेगवेगळी लोणची, पापड, कुरडया, डाळी अशा घरगुती पदार्थांची खरेदी करण्यासाठीही नागरिक गर्दी करत आहेत. याव्यतिरिक्त हुरडयासह विविध शुद्ध शाकाहारी तसेच चमचमीत मांसाहारी खाद्यपदार्थांच्या मेजवाणीवर खवय्ये ताव मारताना दिसत आहेत.लहान मुलांसोबत तरूण देखील आकाशी पाळणा, ड्रॅगन ट्रेन, झिग झॅग रोलर अशा अनेक खेळण्यांचा अनुभव घेताना दिसत आहेत. जत्रेच्या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांची बैठक व्यवस्था असलेले सांस्कृतिक दालन उभारण्यात आले आहे. जेथे ऑर्केस्ट्रा, नाटक, लावणी, गोंधळ, सनई चौघडा अशा अनेक लोककलांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

रविवारी सायंकाळी एस. के. कांबळे प्रस्तुत 'जागर स्त्री शक्तीचा, सूर गृहलक्ष्मीचा' हा बहारदार गीतांचा कार्यक्रम पार पडला ज्यामुळे उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. यामध्ये अनेक महिला कलाकारांनी सहभाग घेतला आणि आपली कला सादर केली.

# गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह तिघांना बेड्या

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह एकूण तीन जणांना अटक केली आहे. आरोपींकडून ९६ किलो गांजा दोन चार चाकी वाहनासह ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. संजय पांडुरंग मोहिते, मनसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक करण्यात आली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड हे पोलीस अंमलदार निखिल वर्पे यांच्यासह गस्त घालत होते. दोन चार चाकी वाहनांमधून गांजाची तस्करी केली जात आहे. अशी माहिती मिळाली. पुणे-नाशिक महामार्गावरील रोहकल फाटा या ठिकाणी नाकाबंदी करून दोन्ही वाहन ताब्यात घेण्यात आली. दोन्ही वाहनातील एकूण तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. त्यांच्याकडे विचारपूस करण्यात आली.

यात एका महिलेचा देखील समावेश होता. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या समक्ष वाहन तपासल्यानंतर दोन्ही वाहनात एकूण सहा पोत्यांमध्ये ९६ किलो २०४ ग्रॅम गांजा आढळून आला. संजय पांडुरंग मोहिते, मनसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक करण्यात आली आहे..या पैकी संजय मोहिते याच्यावर कामशेत आणि लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई होणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

'रस्त्यावर चालणारा प्रत्येक जण गुन्हेगार नाही. वाहतूक पोलिसांनी नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करावी.

मात्र, कारवाई करताना वादाचे प्रसंग टाळावेत. नागरिकांशी सौजन्याने वागावे', असे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी दिले.

पुणे श्रमिक पत्रकार संघाकडून पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी वार्तालाप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव उपस्थित होते.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, 'पुणे शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.

मुंबई पोलीस दलात वाहतूक शाखेत नियुक्ती होण्यापूर्वी पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येते. पुण्यातही वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देण्यसाठी पोलीस दलाअंतर्गत संस्था सुरू करण्यात येणार आहे.

प्रशिक्षण संस्थेसाठी जागेचा शोध सुरू आहे. मात्र, पोलिसांना आतापासून प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली असून, पहिल्या तुकडीतील ५० पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 25/02/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# महानगरपालिकेच्या सेवांचा लाभ घेता येणार घरबसल्या!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता हस्तांतरण, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र यासह विविध सेवांचा लाभ आता शहरातील नागरिकांना घरबसल्या घेता येणार आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, डिजीलॉकर, नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य, व आपले सरकार पोर्टल यांच्यातील आवश्यक असणारे डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाले आहे. यानिमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कागदविरहित आणि नागरिकांभिमूख प्रशासनाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य यांच्यातील डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाल्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ता हस्तांतरण ऑनलाइन पद्धतीने शक्य झाले आहे. मालमत्ता खरेदीदारांना आता मालमत्ता हस्तांतरणासाठी महानगरपालिकेत स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच नाव हस्तांतरणाची प्रक्रिया जलद झाली असून ती एका दिवसात पूर्ण होणार आहे. याशिवाय मालमत्तेच्या वापरातील निवासी ते व्यावसायिक अशा स्वरुपाचा कोणताही बदल महानगरपालिकेच्या रेकॉर्डमध्ये स्वयंचलितपणे अपडेट करणे शक्य होणार आहे. आपले सरकार पोर्टलवर विविध सेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महत्वाच्या काही सेवा प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्र सरकारच्या आपले सरकार पोर्टलवर देखील उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे नागरिकांना महानगरपालिका कार्यालयांना भेट न देत आवश्यक सेवांचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने उद्योगधंदा परवाना, जलनिसरण जोडणी, अग्निशमन विभागाची एनओसी अशा सेवांचा समावेश आहे. विवाह प्रमाणपत्र मिळणार एका क्लिकवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विवाह नोंदणी प्रणाली डिजीलॉकरसोबत यशस्वीरित्या जोडण्यात आली आहे. त्यामुळे रहिवाशांना त्यांचे विवाह प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध होणार आहे. पहिल्या टप्प्यात २०१४ पासून जारी करण्यात आलेले प्रमाणपत्रे आता डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे डिजीलॉकर, नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य, व आपले सरकार पोर्टल यांच्यातील आवश्यक असणारे डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाल्यामुळे आता नागरिकांना महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या सेवा अधिक सुलभपणे देणे शक्य होणार आहे. नागरिकांना जलद आणि अधिक कार्यक्षम प्रशासनाचा अनुभव देता यावा, यासाठी महानगरपालिकेने टाकलेले हा महत्त्वाचे पाऊल आहे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका




# अभिनेते किरण गायकवाड यांची पवनाथडी जत्रेस भेट




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पवनाथडी जत्रा ही केवळ जत्रा नसून पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांसाठी एक उत्सव आहे. महिला बचत गटांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणारा हा उपक्रम खरंच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध मराठी अभिनेते किरण गायकवाड यांनी केले.

महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्य विकसित व्हावे तसेच महिलांचे सबलीकरण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने २१ ते २४ फेब्रुवारी या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या चार दिवसीय जत्रेच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी प्रसिद्ध मराठी अभिनेते किरण गायकवाड यांनी पवनाथडी जत्रेस भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, मुख्य लिपीक देवेंद्र मोरे, किसन केंगले, लिपीक अभिजीत डोळस तसेच महापालिका कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिनेते किरण गायकवाड म्हणाले, पवनाथडी जत्रा महिलांच्या प्रगतीचे, कर्तृत्वाचे आणि आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. या जत्रेमुळे महिलांना केवळ आर्थिक मदतच मिळत नाही, तर त्यांच्यात आत्मविश्वासही वाढतो आहे. त्यामुळे महिलांसाठी ही जत्रा म्हणजे केवळ एक व्यापारमंच नसून, नव्या संधींचे दार उघडणारी वाटचाल आहे, असे सांगून त्यांनी सर्व महिलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

उप आयुक्त अण्णा बोदडे म्हणाले, पवनाथडी जत्रा म्हणजे केवळ एक उत्सव नाही, तर महिलांच्या स्वावलंबनाचा आणि सबलीकरणाचा महत्त्वपूर्ण मंच आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या या जत्रेत महिला बचत गटांनी तयार केलेली हस्तकला उत्पादने, गृहउद्योगातील पदार्थ, विविध कलाकुसरीच्या वस्तू यांना येथे प्रचंड प्रतिसाद मिळतो. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी दरवर्षी आयोजित केला जाणारा हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरत असून, स्वावलंबनाच्या दिशेने महिलांचा एक ठोस टप्पा म्हणून पवनाथडी जत्रेची ओळख निर्माण झाली आहे. आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून महिला बचत गटांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्यातील कौशल्याला योग्य व्यासपीठ मिळवून देणे, हा मुख्य उद्देश आहे, असेही अण्णा बोदडे म्हणाले.

यादरम्यान, पंकज सोनी यांच्या एस.एन.डी ऍकेडमीच्या विद्यार्थ्यांनी गणेश वंदना तसेच शिवतांडव नृत्य सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अभिजीत राजे आणि पौर्णिमा भोर यांनी केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# 'वोल्कथॉन' ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी:- मा.उपमहापौर डब्बू आसवानी यांनी पिंपरी येथे 'हॅप्पीनेस स्ट्रीट' हा उपक्रम राबविला आहे. सदर उपक्रम २९ डिसेंबर २०२४ ते २३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दर रविवारी पिंपरी येथील ओपन लॉन येथे राबविले गेला. 'फिट राहा, आनंदी राहा व संपर्कात राहा, असा संदेश देत हा उपक्रम संपन्न करण्यात आला. या उपक्रमा बाबत डब्बू आसवानी यांच्याशी अधिक माहिती घेतली असता, ते म्हणाले, लहान मुलांसह वयस्कर व्यक्तींनी आनंदी राहावे, विविध खेळाचा आनंद घ्यावा, याकरिता या हॅप्पीनेस स्ट्रीट उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमात लहान मुलांसाठी व युवक-युवतींसाठी तसेच वयोवृद्ध व्यक्तीसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. मनुष्याचे जीवन निरोगी राहण्यासाठी, आयुष्यात खेळांचा समावेश असणे आवश्यक असते, लहान-मोठे वृद्ध सर्वांच्याच जीवनात विविध खेळाचे अनन्य साधारण महत्व असते, आणि यामुळेच पिंपरी चिंचवड शहरातील माजी उपमहापौर हिरानंद उर्फ डब्बू आसवानी यांनी पिंपरी मध्ये 'हॅप्पीनेस स्ट्रीट' नावाचे उपक्रम राबवित आहेत. या उपक्रमाच्या अंतर्गत ४० विविध खेळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमात सर्व वयोगटातील नागरिकांचा सहभाग पाहावयास मिळत आहे. योगा, झुंबा, लाईव्ह म्युझिक, डान्स, ड्रम, लाईव्ह शो, तसेच विविध खेळांच्या स्पर्धा यामध्ये केरेम, बुद्धिबळ, रनिंग, सायकलिंग, जॅमर्स बोवलिंग असे अनेकोनेक उपक्रम या हॅप्पीनेस स्ट्रीट अंतर्गत राबविले. तसेच











दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी या उपक्रमाचा शेवटचा रविवार होता त्या अनुषंगाने डब्बू आसवानी यांनी पिंपरीनगर मध्ये ३ किमी चे 'WALKATHON' चे आयोजन केले होते. 'WALKATHON' साठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन ठेवले गेले होते तसेच रजिस्ट्रेशन साठी ९९ रुपये फी आकारण्यात आली होती. सदर 'WALKATHON' साठी एकूण १४७० नागरिकांचे रजिस्ट्रेशन झाले होते. रजिस्ट्रेशन केलेल्या सर्व नागरिकांना जर्सी तसेच 'WALKATHON' पूर्ण झाल्या नंतर मेडल देण्यात आले. पिंपरी चिंचवड शहर डीसीपी मा.भास्कर ढेरे साहेब, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष योगेश बहल, परमानंद जमतानी, मा.नगरसेवक हरेश आसवानी यांच्या उपस्थितीत 'WALKATHON' ची सुरवात झाली. 'WALKATHON' साठी जमा जालेले डोनेशन रक्कम हि जे.एमडी ग्रुप, सोफोश चाइल्ड आश्रम, अपंग आश्रम पुणे या तिन्ही संस्थाना प्रति ५० हजार रुपायचे चेक देण्यात आले. सदर उपक्रम राबवत असतानी अविनाश इसरानी, पवन भोजवानी, सुरज धरयानानी, मनीष गिरजा, माझे सहकारी, मित्र परिवार तसेच प्रिशा स्कूल मेंबर, जीन मधु जुमानी, शोभा फिटनेस क्लास, गीतुज फिटनेस क्लब, लेट लूज जुंबा पलक अहुजा, टीम डान्ससेशन बाय हितेश आणि कशिश, जीन हरीश गुले, नित्या फिटनेस, विनोद डान्स अकादमी लिशा फिटनेस, किरण योगा ग्रुप, डान्स हूड बाय मेहक, जे,एमडी ग्रुप व इतर सर्व यांच्या सहकार्याने सदर उपक्रम खूप उत्सहात पार पडला त्या बद्दल त्यांचे सर्वांचे त्यांनी आभार मानले. तसेच 'हॅप्पीनेस स्ट्रीट' साठी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसदासाठी सर्व नागरिकांचे मनपूर्वक धन्यवाद मानले

# महापालिकेच्या वतीने जनसंवाद सभा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महापालिकेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या जनसंवाद सभेत आज ९८ तक्रार वजा सूचना नागरिकांनी मांडल्या. शहरातील नागरीक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलद गतीने करण्यासाठी जनसंवाद सभेचे आयोजन महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या सोमवारी सर्व क्षेत्रीय कार्यालयात समन्वय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करण्यात येते.

या जनसंवाद सभेचे अध्यक्षस्थान नेमण्यात आलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी भूषवले.

जनसंवाद सभेत नागरीकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून तक्रारी वजा सूचना मांडल्या. यामध्ये अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे ८,१४,४,२६,८,८,१३ आणि १७ याप्रमाणे एकुण ९८ तक्रारी वजा सुचना नागरिकांनी मांडल्या. जनसंवाद सभेत फुटलेली ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे, नवीन ड्रेनेज लाईन टाकणे, नवीन डीपी उभारणे, अनधिकृत आरओ प्लांट बंद करणे, रस्त्यावरील खड्डे बुजवणे, रस्त्याचे डांबरीकरण करणे, विविध ठिकाणी साचलेला कचरा वेळोवेळी उचलणे, कचरावेचक गाड्या वेळेवर पाठवणे, राडारोडा उचलणे, स्वच्छतागृहांची संख्या वाढवणे, अतिक्रमण हटवणे, अनधिकृत पत्राशेड बांधकामावर कारवाई करणे या तक्रारी वजा




सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

जनसंवाद सभेत येणाऱ्या नागरिक व तक्रारींची संख्या अधिक असल्यामुळे सभेच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी कामकाजाचे विनियमन करण्यासाठी परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. या परिपत्रकाद्वारे सर्व नागरिकांची आसन व्यवस्था प्रतिक्षा कक्षात करावी, नागरिकांच्या तक्रारी नमूद करण्यासाठी अर्जाचा नमुना भरून घ्यावा, प्रत्येक व्यक्तीसाठी वेळ मर्यादा निश्चित करण्यात आली असून नागरिकाची तक्रार समजावून घेतल्यानंतरच दुसरी तक्रार घेण्यात यावी, अधिकारी कर्मचारी यांनी जनसंवाद सभेत सुनिश्चित वेळेवर उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी, तक्रारदार यांचे नाव गोपनीय राहील याची दक्षता घ्यावी, नागरिकांना जनसंवाद सभेचे व्हिडीओ चित्रीकरण करता येणार नाही, जनसंवाद सभेतील अहवाल आणि माहिती पत्रकारांना जनसंवाद सभा संपल्यानंतर देण्यात यावी, जनसंवाद सभा झाल्यानंतर नागरिकांचा अभिप्राय नोंदवून घेऊन भविष्यातील सुधारणांबाबत आढावा घ्यावा असे आदेश निर्गमित करण्यात आले होते त्याप्रमाणे कार्यवाही चालु करण्यात आली आहे.